सकाळ



इस्लामपूर : आरआयटीमध्ये पालक मेळाव्यास उपस्थित पालक.

# 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग'तर्फे आरआयटीमध्ये पालक मेळावा

**इस्लामपूर** : पालक व शिक्षकांत विद्यार्थ्यांच्या सर्वसमावेशक विकासासंदर्भात चर्चा व्हावी, या उद्देशाने राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाया इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातर्फे पालक मेळावा झाला. डॉ. व्ही. एन. कलखांबकर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विभाग आणि महाविद्यालयाद्वारे केलेल्या सर्व प्रयत्नांची माहिती दिली. डॉ. एच टी. जाधव, ए. आर. थोरात, के. एम. नाथगोसावी यांनी चर्चा केली. प्रा. नाथगोसावी यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत पुरवल्या जाणाऱ्या नोकरीविषयक संधींबद्दल माहिती दिली. प्रा. वाय. एन. भोसले यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. पी. डी. बामणे यांनी स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्राम बद्दल माहिती दिली. कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. आर. डी. सावंत, संचालिका डॉ. सुषमा कुलकर्णी, डॉ. व्ही. एन. कलखांबकर यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वयक प्रा. पी. डी. बामणे, सी. एल. भट्टार, आय. श्रीकांत आणि एस. एस. कुंभार यांनी संयोजन केले.

Sangli, Main
14/03/2019 Page No. 3